# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

facebook page /Diwanews

वर्ष-१ ■ अंक-५२ ■ सोमवार, १ ऑगस्ट २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


### ठाण्यात हरवलेली साफिया मिळाली मुंबईत

**ठाणे:** खेळता खेळता वागळे इस्टेट येथील ९ वर्षीय साफिया हिने घरातून ठाणे रेल्वे स्टेशन गाठले. तसेच लोकलमध्ये बसुन ती माटुंगा स्टेशनला उतरली. याचदरम्यान तिला एकटीला पाहून रेल्वे पोलिसांनी बालगृहात भरती केले. तर दुसरीकडे मुलगी हरवल्याने पालकांनी पोलीस स्टेशन गाठल्यावर तिचा शोध सुरू झाला. त्यानंतर ठाणे शहर पोलिसांच्या चाईल्ड प्रोटेक्शन युनीट अवघ्या २४ तासात शोधून तिला तिच्या पालकांच्या स्वाधीन केले. साफिया ही काही महिन्यांपूर्वी बिहारहुन पालकांसह ठाण्यात राहण्यासाठी आल्याचे पोलिसांनी सांगितले.

# ज्या दिवशी दिव्यातील पाण्याचे टँकर बंद होतील आणि लोकांना विकत पाणी घ्यावे लागणार नाही त्या दिवशी मी म्हणेन दिव्यात पाणी पुरवठा वाढला, निवडणूक तोंडावर असताना घोषणा ही नागरिकांची फसवणूक!

## मनसेचे विभाग अध्यक्ष तुषार पाटील यांनी साधला पाणी समस्येवर निशाणा, पाणी वाढले तर नागरिकांना टँकरचे पाणी का घ्यावे लागते, पाटील यांचा सवाल!



**दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिवा न्यूज वर्तमानपत्राशी संवाद साधला.दिव्यातील मूलभूत प्रश्नांवर भाष्य करताना त्यांनी सत्ताधारी आणि प्रशासनाच्या चुकांवर बोट ठेवले. दिवा न्यूजचे संपादक सुहास खंडागळे यांनी मनसेचे विभाग अध्यक्ष तुषार पाटील यांची घेतलेली रोखठोक मुलाखत...**

**प्रश्न:** **दिव्यात पाणी समस्या आहे,नागरिकांना दिलासा म्हणून पाणीपुरवठा ६ एमए ल डी ने वाढवण्यात आला आहे...काय सांगाल?**

**तुषार पाटील:** ज्या दिवशी दिव्यातील पाणी टँकर बंद होतील आणि लोकांना विकत पाणी घ्यावे लागणार नाही त्या दिवशी खऱ्या अर्थाने दिव्यात पाणी वाढले असे मी म्हणेन. निवडणुका जवळ आल्या की फक्त पाणी वाढल्याच्या घोषणा करायच्या, कुठेतरी नारळ फोडायचे आणि दिवा वासियांना मूर्ख बनवायचे असे धंदे येथे सत्ताधारी करत असतात. पाणी वाढले तर मग दिव्यातील टँकर अद्यापही चालू का? असा माझा प्रश्न आहे. याचे उत्तर सत्ताधाऱ्यांनी द्यायला हवं. दुसरी महत्वाची गोष्ट मागील वर्षभरात दिव्यात पाणी वाढल्याच्या तीन वेळा घोषणा झाल्या,यापैकी नेमके किती वेळा पाणी वाढलं? याची आकडेवारी संबंधित अधिकाऱ्यांनी जाहीर करायला हवी.दुसरा मुद्दा महत्त्वाचा दिवा शहरासाठी ,जो पाणीपुरवठा होतो त्यासाठीचा मीटर हा दिवा शहरात लावण्यात यावा. जेणेकरून पाणी वाढले की नाही याचा अंदाज नागरिकांना येईल. एकंदरीत पाहिलं तर दिवा शहरासाठी वाढलेलं पाणी हा गमतीचा विषय झाला आहे. लोकांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागणार नाही त्या दिवशी येथील पाणी समस्या सुटली असा आम्ही म्हणू!

**(पान ३ वर)**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज



# ठाण्यात येत्या ९ ते १७ ऑगस्ट दरम्यान 'स्वराज्य महोत्सव'

**ठाणे :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात येत्या ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या काळात स्वराज महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्यातील स्थानिक प्रशासन, महानगरपालिका, शाळा/महाविद्यालये, पोलीस विभागाने या महोत्सवात आखून दिलेले कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करावे. या महोत्सवात नागरिकांचाही सहभाग घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे यांनी केले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित स्वराज्य महोत्सवाच्या संदर्भात गुरुवारी उपजिल्हाधिकारी ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी जयराज कारभारी, ठाणे महापालिकेचे उपायुक्त बाळासाहेब चव्हाण, सहायक पोलीस आयुक्त अनिल वाघमारे, तहसीलदार राजाराम तवटे, युवराज बांगर, निलिमा सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

स्वराज्य महोत्सवाअंतर्गत जिल्ह्यात ९ ते १७ ऑगस्ट दरम्यान विविध उपक्रम, कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये विविध महाविद्यालये, शाळांमध्ये स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, सायकलोथॉन, मॅरेथॉन, प्रभात फेरी, चित्र प्रदर्शन, ऐतिहासिक वारसा स्थळांच्या ठिकाणी पदयात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आदी कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहेत. तालुका व जिल्हास्तरावर या कार्यक्रमांचे आयोजन विविध विभागाने करून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग घ्यावा, अशा सूचना ठोंबरे यांनी यावेळी केल्या.

संबंधित यंत्रणांनी त्यांना दिलेल्या कार्यक्रमांची योग्य आखणी करून ठरलेल्या वेळेत हे कार्यक्रम साजरे करावेत. त्याची माहिती लोकांपर्यंत जाईल याची दक्षता घ्यावी. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यंत्रणांनी समन्वयाने कामे करावीत, अशा सूचनाही ठोंबरे यांनी दिल्या.

# जिल्ह्यातील स्वाईन फ्लूचा आकडा ६६ वर, दुप्पटीने वाढतोय

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात बुधवारी स्वाईन फ्लूच्या रुग्णांची संख्या ३४ इतकी होती. २४ तासांनी म्हणजे गुरुवारी या रुग्णांची संख्या ६६ वर पोहोचली आहे. एका दिवसात रुग्णांच्या संख्येत दुप्पटीने वाढ झाली आहे. ठ

णे महापालिकेत सर्वाधिक ४० रुग्णांची नोंद झाली असून त्यापाठोपाठ कल्याण डोंबिवली पालिकेत रुग्णांची संख्या ९ वरून १८ इतकी झाली आहे. नवी मुंबईत दोन रुग्णांची वाढ झाल्याने तेथील रुग्णांचा आकडा ५ वर गेला आहे. तसेच बुधवारपर्यंत एकही रुग्णांची नोंद नसलेल्या मिरा भाईंदर मध्ये एका रुग्णांची नोंद करण्यात आली आहे.मृतांच्या आकड्या वाढ झाली नसल्याने ती दिलासादायक बाब आहे.

# काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या समर्थनार्थ देशभर शांततापूर्ण सत्याग्रह



**ठाणे:** अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना नॅशनल हेराल्ड प्रकरणी इडी कार्यालयाने मंगळवारी दिल्लीतील कार्यालयात बोलाविले असता संपूर्ण देशभरात काँग्रेस कार्यकर्त्यांकडून त्यांच्या समर्थनार्थ शांततापूर्ण सत्याग्रह केला.

ठाण्यातील तलावपाळी येथील महात्मा गांधी उद्यानात महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ एकत्र येउन शहराध्यक्ष अँड.विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शांततापूर्ण सत्याग्रह केला याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश पदाधिकारी व शहर कॉंग्रेस व ब्लॉक काँग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने सामील झाले होते याप्रसंगी बोलताना अँड.विक्रांत चव्हाण यांनी सांगितले की,वाढती बेरोजगारी, वाढती महागाई असे देशातील गंभीर झालेल्या समस्येवरून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी केंद्रातील भारतीय जनता पक्षाकडून इडीचा वापर करण्यात येत असून ज्या गांधी घराण्यातील सदस्यांनी अब्जो रूपयाची संपत्ती आपल्या देशातील गरीब जनतेसाठी देश स्वतंत्र झाल्यावर दिली अशा परिवारातील सदस्याच्या मागे इडी लावण्याचा प्रकार म्हणजे केवळ सुडभावनेतूनच करण्यात आला असून काँग्रेस पक्ष सोनिया गांधी यांच्या मागे भक्कमपणे उभा राहील असा विश्वास व्यक्त केला.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# राजस्थानहून मार्बल घेऊन निघालेला ट्रकचा ताबा सुटून दिशादर्शकाला धडक

**ठाणे:** राजस्थान चित्तोड येथून ठाण्यातील वागळे इस्टेट, अंबिका नगर येथे २५ टन मार्बल घेऊन निघालेल्या ट्रक चालक मुमताज खान यांचा ट्रकवरील ताबा सुटला आणि तो ट्रक रस्त्याच्या मधोमध असलेल्या दिशादर्शक फलकाला जाऊन जोरात धडकला. ही धडक इतकी जोरात होती की, अडकलेल्या ट्रक चालकाला बाहेर काढण्यासाठी तब्बल अडीच तासांचा कालावधी लागला. या घटनेत चालक मुमताज खान (२४) यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून क्लिनर सहबाज खान (१७)यांच्या दोन्ही पायांच्या बोटांना किरकोळ दुखापत झाली आहे. ही घटना मंगळवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली.



हरियाणा, मढीगाव येथे रहिवासी असलेले चालक आणि क्लिनर हे दोघे ट्रक मालक साबीर हुसेन यांच्या ट्रकमध्ये २५ टन मार्बल घेऊन राजस्थान चित्तोड येथून ठाण्यातील वागळे इस्टेट, अंबिका नगर येथे निघाले होते. त्यांचा ट्रक घोडबंदर रोड मार्ग जाताना, काही मिनिटांतच ट्रकमधील मार्बल दिलेल्या पत्त्यावर पोहोचणार होता, तोच ट्रकचालक मुमताज यांचा ट्रकवरील ताबा सुटला आणि तो ट्रक रस्त्याच्या मधोमध असलेल्या दिशादर्शक फलकाला जाऊन जोरात धडकला. या अपघात झाल्याची माहिती कापूरबावडी वाहतुक पोलीस अमित पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, कापूरबावडी पोलीस व अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले. अपघातग्रस्त ट्रकच्या केबिनमध्ये चालक अडकला होता. त्या ट्रक चालकाला आपत्ती व्यवस्थापन कक्ष कर्मचारी, अग्निशमन दलाच्या जवानांनी १- कटर मशीन, ३ क्रेनच्या सहाय्याने ट्रकमधून सुमारे अडीच तासाच्या अथक प्रयत्नानंतर बाहेर काढण्यात यश आले. तर जखमी चालक आणि क्लिनर या दोघांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले.तर, अपघातग्रस्त ट्रकला कापूरबावडी पोलिसांच्या मदतीने ३ क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या बाजूला करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षेने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृष्ण बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# पाणी वाढले तर नागरिकांना टँकरचे पाणी का घ्यावे लागते, तुषार पाटील यांचा सवाल!

(पान १ वरून)

**प्रश्न:** दिवा शहर फेरीवाला मुक्त व्हाव यासाठी मनसेने पुढाकार घेतला.मात्र काही दिवसांच्या कारवाईनंतर पुन्हा फेरीवाले बसतात याबाबत काय सांगाल?

**तुषार पाटील:** एकतर दिव्यामध्ये मुख्य रस्ते हे फारच अरुंद आहेत.वाहने त्याचबरोबर रिक्षा, नागरिकांना चालण्यासाठी फुटपाथ या सगळ्याच बाबतीमध्ये अनास्था असताना दुसरीकडे दिवा स्टेशन परिसर आणि मुख्य रस्त्यांच्या बाजूला फेरीवाले बसवले जात असतील तर यामुळे शहर बकाल होत आहेत.शिवाय वाहतूक कोंडी आणि नागरिकांना देखील याचा त्रास होत आहे जर तुम्हाला फेरीवाले बसवायचे आहेत तर शहरात आतील बाजूस असणारे जे रस्ते आहेत त्यांना फेरीवाला क्षेत्र म्हणून तुम्ही घोषित करा. मुख्य रस्ते हे ना फेरीवाला क्षेत्र घोषित करून त्या ठिकाणी फेरीवाले बसल्यास त्यांच्यावर कारवाई करा ही आमची भूमिका आहे आणि त्यासाठी आम्ही पाठपुरावा देखील केला. मात्र इथलं प्रशासन आणि लोकप्रतिनिधी इतके निष्क्रिय झालेले आहेत की त्यांना आर्थिक गोष्टीत जास्त इंटरेस्ट आहे. लोकांच्या समस्याशी त्यांना देणं घेणं नाही असं आम्हाला वाटतं. लोकांनी देखील जागृत असायला पाहिजे आणि आपलं शहर कोण बकाल करत आहे याकडे लक्ष द्यायला पाहिजे असआम्हाला वाटतं.

**प्रश्न:** दिवा मनसेचे नेमकं काय चाललंय

**तुषार पाटील:** दिवा मनसे नागरिकांची कामे करण्यात व्यस्त आहे.आमचे सर्व पदाधिकारी नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतात. प्रशांत गावडे असेल त्याचबरोबर पोरजी असतील, गणेश नगरला कदम असतील, हे लोक नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन सोडवताना दिसतात.आता त्याचा आम्ही इशू करत नाही.दिव्यातील नागरिकांना जेव्हा प्रश्न पडतात तेव्हा त्यांना सर्वप्रथम मनसेच्या शाखा या जवळच्या वाटतात.तुम्ही साबेगाव, दिवा गाव, गणेश नगर,मुंब्रा देवी कॉलनी या ठिकाणी अनेक छोटे छोटे प्रश्न सोडवण्यासाठी मनसे सातत्याने काम करते. त्यामुळे जनतेची काम करण्यामध्ये आम्ही व्यस्त आहोत.

**प्रश्न:** दिव्याच्या विकासाबाबत काय बोलाल दिव्यात बदल घडताना दिसतोय का?

**तुषार पाटील:** मोठमोठे कॉन्ट्रॅक्ट म्हणजेच बदल असं म्हणता येणार नाही. दिव्यातील सर्वसामान्य माणसांचं राहणीमान सुधारते का? दिव्यातील सर्वसामान्य माणसाला त्याच्या समस्यांपासून दिलासा मिळतोय का? दिव्यातील नागरिकांचा प्रमुख प्रश्न असणारा पाणी प्रश्न सुटतोय का? या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. ज्या दिवशी दिव्यातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सुटायला लागतील त्या दिवशी आम्ही म्हणू की दिवा शहराची वाटचाल विकासाच्या दिशेने होत आहे. आपल्या मर्जीतील लोकांचीच काम करून देणे, याला विकास म्हणता येणार नाही.शिवाय जी काही काम होत आहेत, तुम्ही जर पाहिलेत... जे सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते होत आहेत त्यांना अनेक ठिकाणी तडे गेलेले आपल्याला पाहायला मिळतात. मग कामाच्या दर्जाबाबत आपण काय म्हणायचं ? पुन्हा हा निधी दिव्यासाठी मिळणार आहे का? त्यामुळे झालेली काम ही दर्जेदार आहेत की नाही याचा विचार होणे गरजेचा आहे.

**प्रश्न:** दिव्यातील नागरिकांची दिशाभूल केली जातेय असं तुम्हाला म्हणायचं आहे का?

**तुषार पाटील:** डम्पिंगच्या मुद्द्यावर दिव्यातील नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झालेला आहे. डम्पिंग हा भावनिक प्रश्न असल्याने त्याबाबत काहीतरी निवडणूक तोंडावर घोषणा करायच्या आणि तेवढी वेळ मारून न्यायची हाच कारभार यांचा चालू आहे. मला असं वाटतं लोकांनी आता यांना मतपेटीतून उत्तर दिलं पाहिजे.

दिव्यातील अनेक प्रकल्प मागील पाच वर्षात रखडले आहेत आणि त्यामुळे येथील शहरातील नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होतोय.तुम्ही जर पाहिलं तर दिवा शहरासाठी महत्त्वाचा असणारा दिवा पूर्व पश्चिम ब्रिज हा पाच वर्ष रखडलेला आहे. याला जबाबदार कोण? जितकी वर्ष हा ब्रीज रखडणार त्याचा फटका हा प्रशासनाबरोबर नागरिकांना सर्वात मोठ्या प्रमाणात बसत असतो.पाच वर्षात वाढलेली लोकसंख्या वाहनांची वाढलेली संख्या या सगळ्या गोष्टींचा परिणाम होत असतो. ही काम ,लेट करण्याचं काम ज्यांनी केलं दुर्दैवाने ते सगळे सत्ताधारीच होते. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी दिव्यातील विकास कामांकडे गांभीर्याने पाहिलं नाही. वेळेत काम होतील याकडे लक्ष दिलं नाही आज जी परिस्थिती दिव्यातील प्रकल्पाबाबत आहे.. मग तो ड्रेनेजचा प्रश्न असेल,मलनिस्सारण वाहिन्यांचा प्रश्न असेल, कचरा उचलण्याचा प्रश्न असेल, साफसफाई बाबतचे धोरण असेल,सर्वच आघाड्यांवरती पालिका प्रशासन आणि सत्ताधारी अपयशी ठरलेले आपल्याला दिसतात.चांगल्या अधिकाऱ्याला दिव्यामध्ये टिकू दिला जात नाही. त्यामुळे दिव्यात जर बदल घडवायचा असेल तर मुळात सत्ताधारी बदलायला हवेत. कारण सत्ताधाऱ्यांची मानसिकता असायला हवी की आपल्याला दिव्यातील नागरिकांना चांगले जीवन द्यायचं आहे.मला वाटतं यामध्ये कुठेतरी लोकांनी पण आता लक्षात घेतलं पाहिजे की तुमचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठीच्या लोकप्रतिनिधींना तुम्ही निवडून दिले पाहिजे..!

## क्लस्टर डेव्हलपमेंटकरीता ठाणे आयटीआयच्या जागेबाबत कौशल्य विकास, ठाणे मनपा यांनी त्वरीत बैठक घ्यावी

**ठाणे :** ठाण्यातील वागळे इस्टेट आयटीआय तसेच कोपरी आयटीआयच्या ताब्यातील जागा क्लस्टर डेव्हलपमेंटकरीता ठाणे महापालिकेस वर्ग करण्याबाबत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. यासंदर्भात कौशल्य विकास विभाग आणि ठाणे महापालिका यांनी त्वरीत संयुक्त बैठक घ्यावी. आयटीआयच्या मुलांची सोय व्हावी व त्यांचे नुकसान होऊ नये या पद्धतीने चर्चा करुन कार्यवाही करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे गुरुवारी ठाणे जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विविध बैठका संपन्न झाल्या. आयटीआयच्या प्रश्नावर झालेल्या बैठकीस ठाणे महापालिका आयुक्त विपीन शर्मा, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे सहसचिव नामदेव भोसले, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालक दिगंबर दळवी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आयटीआय परिसरातील काही ईमारती जुन्या झाल्या असून मोडकळीस आल्या आहेत. त्यांची दुरुस्ती, पुनर्विकास करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. आयटीआय मुलांची सोय व्हावी, त्यांचे नुकसान होऊ नये या पद्धतीने नियोजन करण्यात यावे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## साडे सहा एमएलडी अतिरिक्त पाणी पुरवठ्यामुळे दिव्याची तहान भागणार...

**दिवा:-**अनेक महिन्यांपासून दिवा विभाग आणि परिसरात पाणी टंचाईची समस्या नागरिकांना भेडसावत होती. दिवा शहर आणि परिसरात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणामध्ये लोकसंख्या वाढत असून त्यामुळे या भागातील पाणी पुरवठ्यावर त्याचा ताण पडत असल्याकारणाने येथे पाणी टंचाईची समस्या मोठ्या प्रमाणावर उद्भवली होती. दिव्याला अतिरिक्त पाणीपुरवठा व्हावा, या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरु होता. राज्याचे मुख्यमंत्री . एकनाथ शिंदे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात नुकतीच विशेष बैठक पार पडली होती. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री महोदय . एकनाथ शिंदे साहेब यांनी तातडीने ठाणे तसेच दिवा शहराला अतिरिक्त पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे अतिरिक्त पाणी पुरवठा आजपासून उपलब्ध झाला असून आज कोरम मॉल ठाणे परिसरातील व्हॉल सुरु करत हा पाणी पुरवठा नियमित केला. यातून साडे सहा एमएलडी पाणी पुरवठा हा दिवा विभाग आणि परिसराला आजपासून होणार आहे. त्यामुळे प्रदीर्घ कालावधीपासून असलेली दिवा विभाग आणि परिसरात पाणी टंचाईची समस्या आता कायमस्वरूपी सुटणार आहे.

**दिवा परिसराला साडे सहा एमएलडी अतिरिक्त पाणीपुरवठा सुरु**

# ठाण्यात कारगिल विजय दिनानिमित्ताने २५० तरुणांकडून अग्निवीरची माहिती

## भाजपा, विश्वास सामाजिक संस्थेचा उपक्रम

**ठाणे:** कारगिल विजय दिनानिमित्ताने अग्निवीर भरतीच्या माहितीसाठी आयोजित केलेल्या शिबिराला ठाण्यातील सुमारे २५० तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भाजपा, विश्वास सामाजिक संस्था आणि हिंदू रोजगार डॉट कॉम यांच्यावतीने झालेल्या शिबिरात कॅ. स्वामीनाथन व प्रेरणादायी वक्त्या प्रिया सावंत यांनी तरुणांना मार्गदर्शन केले.ठाणे शहरात प्रथमच अग्निपथ भरतीबाबत शिबीर घेण्यात आले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संरक्षण मंत्रालयाने सैन्य दलात भरतीसाठी अग्निपथ योजना जाहीर केली आहे. या योजनेत ठाण्यातील तरुण-तरुणींचा सहभाग वाढविण्यासाठी माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले यांनी पुढाकार घेतला आहे. त्यादृष्टीने त्यांच्याकडून ठाण्यात आज शिबीर भरविण्यात आले.या शिबिराला भाजपाचे आमदार निरंजन डावखरे,माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले, नम्रता कोळी, भाजयुमोच्या कोकण सहसंयोजिका वृषाली वाघुले आदींची उपस्थिती होती.या कार्यक्रमात आजच्या कारगिल विजय दिनानिमित्ताने शहीद सैनिकांचे स्मरणही करण्यात आले.

अग्निपथ भरतीविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठी ठाण्यात सर्वप्रथम शिबीर घेतल्याबद्दल आमदार निरंजन डावखरे यांनी विश्वास सामाजिक संस्थेचे कौतुक केले. भारतीय जवानांचे सरासरी वय ३२ आहे. अग्निपथ योजनेमुळे सैन्यदलाचे वय कमी झाल्याने, भविष्यात भारतावर हल्ला करण्याची शत्रूची हिंमत होणार नाही, असे मत आमदार डावखरे यांनी व्यक्त केले.कॅ. स्वामीनाथन यांच्याकडून अग्निपथ योजनेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. अग्निवीर भारताचे भविष्य आहे. या योजनेसंदर्भात गैरसमजांना बळी न पडता तरुणांनी अग्निवीर व्हावे. तरुणांमधील आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकासासाठी अग्निपथ योजना लाभदायी आहे, असे कॅ. स्वामीनाथन यांनी सांगितले. अग्निवीर म्हणून कार्य केल्यानंतर तरुणांमध्ये आत्मविश्वास, व्यक्तीमत्व विकास आणि शिस्त वाढेल. चार वर्षांच्या नोकरीनंतर किमान १५ ते २० लाख रुपयांचे भांडवल २२ वर्षांच्या मुलाकडे असेल.

# आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते उत्तमराव खडसे यांचे निधन

**ठाणे :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी (इंदिसे) चे राष्ट्रीय सरचिटणीस तथा ठामपाच्या शिक्षण मंडळाचे माजी सदस्य उत्तमराव खडसे यांचे बुधवारी २७ जुलै रोजी पहाटे अल्पशः आजाराने निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मूळचे वाशीम जिल्ह्यातील असलेले खडसे हे नोकरीनिमित्त ठाण्यात स्थायिक झाले होते. नोकरी करीत असतानाच ते नानासाहेब इंदिसे यांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी स्वतःला आंबेडकरी चळवळीत झोकून दिले होते. रिडल्स आणि नामांतर लढ्यात त्यांचे मोठे योगदान होते. गेल्या चार दिवसांपासून ते आजारी होते. मानपाडा येथील खासगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर वागळे ईस्टेट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आंबेडकरी चळवळीतील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षकांना मिळणार दुय्यम सर्विस बुक व सॅलरी स्लिप

## ठाणे, पालघर, रायगड व मुंबईतील हजारो शिक्षकांना मोठा दिलासा

**ठाणे:** शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आता दुय्यम सेवा पुस्तक व वेतन स्लिप देणे सक्तीचे केले असून भाजपा शिक्षक आघाडीच्या पाठपुराव्यामुळे मंगळवारी मुंबईच्या शिक्षण उपसंचालकांनी आदेश काढले असल्याचे भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक अनिल बोरनारे यांनी सांगितले. अनेक शाळांमध्ये सर्विस बुकची दुय्यम प्रत व सॅलरी स्लिप देत नसल्याच्या तक्रारी येत होत्या या तक्रारींची दखल घेत बोरनारे यांनी १४ जुलै २०२२ रोजी शिक्षण उपसंचालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन याबाबत तक्रार करून निवेदन दिले होते. या निवेदनाची तात्काळ दखल घेत मुंबई विभागाचे शिक्षण उपसंचालकांनी मंगळवारी २६ जुलै रोजी शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर, पश्चिम व दक्षिण विभाग तसेच ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापकांनी दुय्यम सेवा पुस्तक व प्रत्येक महिन्याची वेतन स्लिप देण्याचे आदेश दिलेले आहे. सर्विस बुक हा शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा महत्वाचा दस्तऐवज असतो. या मध्ये वेतनश्रेणी, इन्क्रीमेंट, घेतलेले प्रशिक्षणे, शैक्षणिक अहर्ता वाढविणे, किरकोळ रजा, वैद्यकीय रजा, वेतन आयोगांचे स्टॅम्पिंग आदी महत्वाच्या नोंदी असतात तर सॅलरी स्लिप मध्ये मूळ वेतन, डीए, घरभाडे, वाहतूक भत्ता व अन्य कपात याचा समावेश असल्याने शिक्षकांना हे दोन्ही दस्तऐवज महत्वाचे आहेत, निवृत्तीच्या वेळी सर्विस बुक ग्राह्य धरले जाते त्यामुळे याची दुय्यम प्रत शिक्षकाजवळ असणे गरजेचे आहे.

> ***"शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दुय्यम सेवा पुस्तक व वेतन स्लिप मिळणे हा त्यांचा हक्क आहे व अशी तरतूद महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली १९८१ च्या नियम ११ मध्ये देखील आहेत परंतु त्याची अंमलबजावणी अनेक शाळांमध्ये केली जात नसल्याने शिक्षण उपसंचालकांकडे तक्रार केली होती. या आदेशाचा फायदा मुंबईसह ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील हजारो शिक्षक-शिक्षकेतरांना होणार आहे.***
>
> ***- अनिल बोरनारे***, *प्रदेश सहसंयोजक, भाजपा शिक्षक आघाडी*

# गावदेवीतील ७२ सफाई कामगारांना हक्काची घरे द्या

## - श्रमिक जनता संघाची मागणी

**ठाणे :** गावदेवी येथील सफाई कर्मचाऱ्यांची वसाहतीतील इमारती धोकादायक झाल्याने त्या इमारती पडण्यात आल्या होत्या. मात्र, त्यातील सफाई कामगारांना पुनर्वसनाचे करण्यात आले नव्हते. या संदर्भात मागील २८ वर्षापासून पाठपुरावा केल्यानंतर ७२ सफाई कामगारांना घरे देण्यात आली आहे. मात्र, ही घरे देताना, ताबापावती पत्रात लिहिलेला मजकूर हा आक्षेपार्ह आणि सफाई कर्मचाऱ्यांची दिशाभूल व फसवणूक करणारी आहे. त्यातच सदनिका जर मालकीची असेल तर हक्क राहणार नाही, ही अट कशासाठी ? असा सवाल देखील श्रमिक जनता संघाचे सरचिटणीस जगदीश खैरालिया यांनी उपस्थित केला आहे.

गावदेवी येथे सफाई कामगारांची वसाहत होती. तीन माळ्याच्या तीन इमारती होत्या. या इमारतीत सफाई कामगारांची ७२ कुटुंब राहात होती. इमारती धोकादायक झाल्याने १९९५ मध्ये महापालिकेकडून इमारती पाडण्यात आल्या व त्याबरोबर १८ महिन्यात पुन्हा याच ठिकाणी करणार व खोल्यांचे मालकी हक्क कामगारांना देणार असे सफाई कामगारांना करारनामे करून देण्यात आले होते. तसेच नवीन इमारती बांधणीसाठी तत्कालिन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी भूमिपूजन केले होते. त्याच जागी सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्याचे आश्वासन महापालिका प्रशासनाने सत्य प्रतिज्ञापत्रावर कर्मचाऱ्यांना दिले होते. तसेच स्व. आनंद दिघे आणि त्यावेळचे महापौर अनंत तरे यांनी साक्षीदार म्हणून त्या हमीपत्रावर स्वाक्षरी केली होती. असे असताना, ठाणे महापालिका प्रशासनाने मालकीची घरे देताना या ताबापावती पत्रात लिहिलेला मजकूर हा आक्षेपार्ह आणि सफाई कर्मचाऱ्यांची दिशाभूल व फसवणूक करणारा असल्याचे या पत्रात घातलेल्या अटी व शर्तीवरून स्पष्ट होत असल्याची टीका श्रमिक जनता संघाचे सरचिटणीस खैरालिया यांनी केली. तसेच बीएसयुपी योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या सदनिकांमध्ये आपला कोणताही हक्क राहणार नाही. त्या सदनिका जर मालकीची असेल तर हक्क राहणार नाही, ही अट कशासाठी ? असा सवाल खैरालिया यांनी उपस्थित करत, स्व. आनंद दिघे यांच्या साक्षीने केलेला प्रतिज्ञापत्र खोटा ठरवल्याचे ठाणे महापालिका प्रशासनाचे हे वर्तन निंदनीय असल्याचे ही त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सत्य प्रतिज्ञापत्रावर कबूल केल्याप्रमाणे गावदेवी येथील ७२ सफाई कर्मचाऱ्यांना त्याच ठिकाणी मालकी हक्काची घरे मोफत उपलब्ध करून द्यावीत, तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली.

# ठाणे स्मार्ट सिटी अंतर्गत येणारी तंत्रज्ञानयुक्त एंटरप्राइज रिसोर्स प्लानिंग (ईआरपी) योजना रखडली

## गेल्या ३ वर्षात केवळ पाच टक्के काम

**ठाणे :** ठाणे महापालिकेचे प्रत्येक विभाग तंत्रज्ञानाने स्मार्ट करण्यासाठी शहरात स्मार्ट सिटीच्या अंतर्गत एंटरप्राइज रिसोर्स प्लानिंग (ईआरपी) अर्थात उद्यम संसाधन प्रकल्प माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून २०१९ मध्ये आणला गेला.

एक वर्षात हा प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र गेल्या तीन वर्षांपासून हा प्रकल्प रखडलेला असून केवळ ५ टक्केच काम ठेकेदाराने पूर्ण केले असूनही पालिकेने सुमारे १४ कोटीच्या प्रकल्पातील १० टक्क्याहून अधिक बिल अदाही केल्याची माहिती मनसेचे जनहित विधी विभागाचे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी उघडकीस आणली आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध विभागामधील जसे घनकचरा, सार्वजनिक बांधकाम विभाग, आस्थापना, फायर, मालमत्ता, लेखापरीक्षण, कायदा, भांडार, सार्वजनिक बांधकाम, सुरक्षा, समाजकल्याण, पाणीपुरवठा विभाग, जन्ममृत्यू विभाग अशा विभागाचे काम स्मार्ट सिटी अंतर्गत अधिक स्मार्ट करत तंत्रज्ञानाचा वापर करून काम लवकर व सोयीस्कर होण्याच्या हेतूने हा प्रकल्प एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार होता. या प्रकल्पाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनातून एच.आर.एम.एस (मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली हा महत्त्वाचा प्रकल्प या योजनेच्या मार्फत राबविण्यात येणार होता, पण गेल्या तीन वर्षात या प्रकल्पाचे काम केवळ ५ टक्केच झालेले असूनही पालिका याबाबत ठेकेदाराला कोणतीही विचारणा करत नसल्याचे दिसून येते.

**ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड वेबसाईट बंद**

ठाण्यातील स्मार्ट सिटी अंतर्गत जी कामे केली जात होती, त्या कामांची सर्वच माहिती या वेबसाईटवर उपलब्ध असायची. यामध्ये कोणत्या प्रकल्पाचे काम किती टक्के झालं किती टक्के बाकी आहे, याची माहिती ठाणेकरांना मिळत होती. मात्र पालिकेच्या गलथान कारभारामुळे गेल्या महिनाभरापासून ही वेबसाईट बंद करण्यात आली आहे.

या प्रकल्पा अंतर्गत येणार एचआरएमएसने पालिकेच्या कर्मचाऱ्यांना चांगलीच शिस्त लागली असती. पालिकेच्या अनेक विभागामध्ये आजही कर्मचारी ११ नंतर येतात आणि ४ वाजता निघून जात असल्याचे पाहयाला मिळते तसेच उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना या प्रकल्पामुळे शिस्त लागली असती.

> *ठाणे स्मार्ट सिटी मधील सर्व प्रकल्प २०२३ या वर्षाअखेर पर्यंत पूर्ण करावे असा केंद्र शासना आदेश असून ठाणे शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत राबवलेले बहुतेक महत्त्वाचे प्रकल्प अजून अपूर्ण स्थितीत आहेत. ठाणे महानगर पालिकेच्या विविध विभागाच्या कामात गती मिळावी तसेच सामान्य नागरिकांचा वेळा आणि पैस कमी खर्च व्हावा या दृष्टीने हा प्रकल्प महत्वाचा असूनही केवळ पालिकेतील अधिकाऱ्यांच्या काम न करण्याच्या मानसिकतेमुळे तसेच ठेकेदाराचा काम चुकारपणाच्या धोरणामुळे हा प्रकल्प बंद होण्याच्या मार्गावर आहे.*
>
> **– स्वप्नील महिंद्रकर,**
> शहर अध्यक्ष,
> मनसेचे जनहित विधी विभागचे

# विसर्जन घाट व कृत्रिम तलावांची महापालिका आयुक्तांकडून पाहणी

**ठाणे:** सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्ती विसर्जनासाठी ठाणे महापालिकेच्यावतीने तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांची व विसर्जन घाटांची बुधवारी महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी पाहणी केली. प्रत्येक विसर्जन घाटावरील अत्यावश्यक कामे तातडीने करण्याचे निर्देश देतानाच यंदाच्या गणेशोत्सवासाठी महापालिका यंत्रणा सज्ज असल्याचेही महापालिका आयुक्तांनी सांगितले. त्याचबरोबर प्रत्येक विसर्जन ठिकाणी अँन्टीजन चाचणी केंद्र उभारण्यात येणार असून बुस्टर डोस देण्याचीही व्यवस्था करण्यात येणार असल्याचे सांगितले.



महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी शहरातील उपवन तलाव, कोलशेत महाविसर्जन घाट, पारसिक रेतीबंदर, मुंब्रा, मासुंदा तलाव, कोपरी व रायलादेवी तलाव आदी ठिकाणच्या विसर्जन व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मार्गावर पडलेले खड्डे तसेच शहरात इतर ठिकाणी रस्त्यांना पडलेले खड्डे तातडीने बुजविणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी बांधकाम विभागास दिले.तसेच विसर्जन घाटावर आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे, विद्युत व्यवस्था, गणेशमूर्ती विसर्जन ठिकाणी निर्माल्य कलशाची व्यवस्था करणे, गणेशमूर्ती विसर्जन फिरते स्विकृती केंद्रासाठी, निर्माल्य वाहतुकीसाठी लागणाऱ्या वाहनांची व्यवस्था करण्याचे निर्देश त्यानी संबंधितांना दिले.

श्री गणेश मूर्तीचे विधिवत वाहत्या पाण्यात विसर्जन व्हावे यादृष्टीकोनातून महापालिकेने एकूण ७ मोठे विसर्जन घाट तयार केले आहेत. या ठिकाणी छोटया गणेश मूर्तीबरोबर मोठया आकाराच्या गणेश मूर्तीचे विसर्जन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. श्री गणेश मूर्तींच्या विसर्जनामुळे शहरातील तलावांचे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्यावतीने कृत्रीम तलाव निर्माण करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे ज्या भाविकांना विसर्जन घाट किंवा कृत्रीम तलावांच्या ठिकाणी श्री मुर्तीचे विसर्जन करता येणे शक्य नाही त्यांच्यासाठी महापालिका श्री गणेश मुर्ती स्वीकार केंद्रे उभारणार आहे. तसेच प्रभाग समितीतंर्गत फिरती विसर्जन व्यवस्था असणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी बुधवारी सकाळी उपवन तलाव विसर्जन घाट येथून कृत्रिम तलावांची व विसर्जन घाटांची पाहणी करण्यास सुरुवात केली. यावेळी माजी महापौर नरेश म्हस्के, माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर, माजी नगरसेवक उमेश पाटील, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, माजी नगरसेवक विकास रेपाळे, माजी नगरसेविका नम्रता जाधव, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त(२) संजय हेरवाडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, अतिरिक्त नगर अभियंता अर्जुन अहिरे, उप आयुक्त मनीष जोशी, उप आयुक्त जी.जी.गोदेपुरे, उप आयुक्त शंकर पाटोळे, उप आयुक्त दिनेश तायडे, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे, अजय एडके, प्रीतम पाटील, समीर जाधव, सागर सांळुखे तसेच संबंधित कार्यकारी अभियंता व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### विसर्जनस्थळी बुस्टर डोस देण्याचीही व्यवस्था

*गणेश विसर्जनाच्यावेळी गर्दी होवू नये यासाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गणेशमूर्ती विसर्जनासाठी महापालिकेच्यावतीने ऑनलाईन टाइमस्लॉट बुकिंग सुविधा यावर्षी देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कोरोनाची खबरदारी म्हणून महानगरपालिकेच्यावतीने प्रत्येक विसर्जन ठिकाणी अँन्टीजन चाचणी केंद्र उभारण्यात येणार असून बुस्टर डोस देण्याचीही व्यवस्था तिथे करण्यात येणार आहे.*

# सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परवानगीसाठी महापालिकेची एक खिडकी सुविधा

**ठाणे:** ठाणे महानगरपालिका हद्दीत गणेशोत्सवासाठी प्रसंगी तात्पुरत्या स्वरुपात सार्वजनिक ठिकाणी मंडप, स्टेज उभारण्यासाठी आता मंडळांना ऑनलाईन अर्ज उपलब्ध करण्यासोबतच मंडळांना संबंधित प्रभाग समिती क्षेत्रातील नागरी सुविधा केंद्र येथील एक खिडकी योजनेद्वारे देखील अर्ज सादर करता येणार आहेत. या दोन्ही पध्दतीने सादर केलेल्या अर्जांची छाननी केल्यावर संबंधित प्रभाग समितीकडून परवानगी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी मंगळवारी दिली. तसेच ठाणेकरांनी यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून उत्साहात साजरा करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

ठाणे महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात मंगळवारी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने ठाणे महापालिका,पोलीस यंत्रणा,वाहतूक पोलीस, महावितरण, गणेशोत्सव मंडाळाचे प्रतिनिधी, गणेश मूर्तिकार यांच्या समवेत समन्वय बैठक पार पडली. या बैठकीस,अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-५) डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उपायुक्त(परिमंडळ-१) अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त(वाहतूक) दत्तात्रय कांबळे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त जी.जी.गोदेपुरे यांच्यासह महापालिकेचे इतर वरिष्ठ अधिकारी, पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, महावितरणचे अधिकारी आदी उपस्थित होते.

शासनाने २०२२ च्या गणेशोत्सवासाठी मंडप परवानगी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मंडप परवानगी शुल्क व अनामत रक्कम न घेण्याबाबत निर्णय घेतला आहे याची माहिती डॉ. शर्मा यांनी दिली.

ठामपाच्या वतीने गणेशोत्सवासाठी तात्पुरत्या स्वरुपात सार्वजनिक ठिकाणी मंडप, स्टेज उभारण्यासाठी मंडळांना ऑनलाईन अर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच प्रभाग समिती क्षेत्रातील नागरी सुविधा केंद्र येथील एक खिडकी योजनेद्वारे देखील अर्ज सादर करता येतील. यामध्ये वाहतूक पोलीस व पोलीस प्रशासन यांच्या प्रतिनिधी संबंधित सादर केलेल्या अर्जांची छाननी करतील व संबंधित प्रभाग समितीकडून परवानगी प्रदान करण्यात येणार आहे. महावितरणनेही यात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. शर्मा यांनी केले.

## यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक, सामाजिक प्रबोधनास प्राधान्य देत उत्साहात साजरा करावा महापालिका आयुक्तांचे ठाणेकरांना आवाहन

ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ई-सुविधा सदर सुविधा tmc.infosoftech.co.in/ Mandaponline.html या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच ऑनलाईन सुविधेमध्ये मंडप परवानगीसाठी पोलीस विभाग, वाहतुक पोलीस विभाग व अग्निशमन विभाग यांचा ना हरकत दाखला ऑनलाईन पध्दतीने api.infosoftech.co.in// login या लिंकवर ऑटो जनरेट पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

महापालिकेने दिलेली परवानगी मंडपाच्या दर्शनी भागावर मंडळांनी लावणे बंधनकारक राहील. अन्यथा परवानगी नाही असे गृहित धरुन महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात येईल असे महापालिकेच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे

दरम्यान उत्सव किंवा कार्यक्रमास, मंडप, स्टेज व कमानी उभारण्याकरिता महापालिकेने सविस्तर कार्यपध्दती निश्चित केली असून ती महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१७३/२०१० मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन सर्व उत्सव मंडळांनी करणे बंधनकारक असणार आहे.

### मंडळांनी परंपरा कायम राखावी

आजच्या बैठकीत ठाण्यातील गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी,कार्यकर्ते सहभागी होते. त्यांनी गणेश आगमन ते विसर्जन सुविधा,त्यांची व्यवस्था,येणाऱ्या अडचणी मांडल्या .त्याला आयुक्त डॉ. शर्मा यांनी प्रतिसाद दिला. तसेच कोविड काळानंतर होत असलेल्या या उत्सवात मोठ्या जल्लोषात सहभागी होताना ठाण्याची उत्सवप्रियतेची सकारात्मक परंपरा कायम राखावी असे आवाहनही डॉ. शर्मा यांनी केले.

### उपायुक्त गोदेपुरे नोडल अधिकारी

गणेशोत्सव काळात महापालिकेच्या परवानगी,व्यवस्था आदींबाबत काहीही अडचणी असल्यास त्या सोडविण्यासाठी उप आयुक्त जी.जी. गोदेपुरे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच परवानगीबाबत काही अडचणी असल्यास ८६५७८८७१०१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### ओव्हरहेड वायरची उंची वाढवावी

यंदाच्या गणेशोत्सवासाठी गणेश मुर्तीच्या उंचीचे निबंध शासनाकडून हटविण्यात आलेले आहे. त्यामुळे गणेश मूर्तीचे आगमन व गणेश मूर्तीचे विसर्जन मार्गावरील ओव्हरहेड वायरची पाहणी करून कमी उंचीवर असलेले ओव्हरहेड वायरची उंची वाढविण्याचे काम तसेच सर्व गणेशोत्सव मंडळांना नियमानुसार वीज पुरवठा करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी महावितरण विभागास दिल्या.

### पोलीस यंत्रणा सज्ज

गणेश मूर्तीचे आगमन व विसर्जनावेळी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक तो पोलीस यंत्रणा आगमन / विसर्जन मार्गावर तसेच कृत्रिम तलावाच्या ठिकाणी व विसर्जन घाटावर कार्यान्वित ठेवण्याबाबत पोलीस विभागाकडून उचित कार्यवाही करण्यात येणार असल्याचे परिमंडळ पोलीस उपायुक्त विनय राठोड यांनी यावेळी सांगितले.

### न्यायालयाच्या आदेश पालन करावे

सण-उत्सवांच्या प्रसंगी सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात येणारे मंडप, स्टेज व ध्वनी प्रदुषणाबाबत उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१७३/२०१० च्या अनुषंगाने दिलेले आदेश व कायदेशीर तरतुदींची माहिती देण्याकरिता प्रभाग समिती स्तरावर मंडळांच्या बैठका आयोजित करण्यात येणार आहेत.

# गोताडवाडी पर्यंत जाणारी बस खंडागळे-एरंडेवाडी पर्यंत सुरू करा!

## गाव विकास समितीचे नितीन गोताड व दीक्षा खंडागळे यांची एसटी प्रशासनाकडे मागणी

**स्थानिक ग्रामस्थ अशोक सावंत,विजय सावंत यांनीही एक महिन्यांपूर्वी केली होती मागणी,प्रशासन लक्ष देत नसल्याने गाव विकास समिती कडून पाठपुरावा सुरू!**

**देवरुख:**-खंडागळे वाडी-परशुराम वाडीला जोडणारा बावनदी वरील पादचारी पूल मागील पावसाच्या पुरात वाहून गेला आहे.परिणामी खंडागळे वाडी व एरंडेवाडी या दोन वाड्यांचा देवरुख शहराशी व तालुक्याच्या ठिकाणाशी संपर्क तुटलेला आहे.ही बाब लक्षात घेऊन या दोन्ही वाड्यांसाठी तातडीने एसटी बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी गाव विकास समितीच्या माध्यमातून सौ.दीक्षा खंडागळे व नितीन गोताड यांनी एसटी अधिकाऱ्यांची भेट घेऊन केली आहे.

बस सुरू व्हावी यासाठी महिना भरापूर्वी स्थानिक ग्रामस्थ समाजसेवक अशोक सावंत व विजय सावंत यांनीही पत्र दिले आहे.नागरिकांची मागणी असतानाही अद्याप बस सुरू झाली नसल्याने येथील नागरिकांची अडचण लक्षात घेऊन आता याबाबत गाव विकास समितीने देखील पाठपुरावा करण्यास सुरुवात केली आहे.पूल वाहून गेल्याने येथील नागरिकांना कामानिमित्त तालुक्याच्या ठिकाणी येण्यासाठी जवळपास १७ ते २० किमीचे अंतर खासगी वाहनाने यावे लागते.दैनंदिन कामे करताना अनेक वेळा वाहने न मिळाल्याने गोताडवाडी पर्यंत पायपीट करावी लागते.शिवाय खासगी वाहने ही खर्चिक बाब आहे असे एसटी आगराला दिलेल्या पत्रात गाव विकास समितीने म्हटले आहे. एसटी महामंडळ मार्फत देवरुख ते गोताडवाडी ही बस सकाळी ११ वाजता व संध्याकाळी ४ वाजता सुरू आहे.येथून पुढे खंडागळे वाडी व एरंडेवाडी या दोन्ही वस्त्या केवळ दीड ते दोन किलोमीटर अंतरावर आहेत.याठिकाणी जाण्यासाठी रस्ता रुंद व पक्क्या स्वरूपाचा आहे याकडे ही गाव विकास समितीने लक्ष वेधले आहे. पूल वाहून गेल्याने याभागातील नागरिकांना दळणवळण साधने उपलब्ध नाहीत,तरी कामानिमित्त शहरात जाणारे नागरिक,शाळेसाठी जाणारे विद्यार्थी लक्षात घेऊन आपण गोताडवाडी पर्यंत असणारी बस सेवा पुढे खंडागळे वाडी,एरंडेवाडी पर्यंत विस्तारित करून पावसाळ्यात येथील नागरिकांना दिलासा द्यावा अशी विनंती पत्राच्या माध्यमातून दीक्षा खंडागळे,अनघा कांगणे,सुनिल खंडागळे ,नितीन गोताड,मनोज घुग,दैवत पवार यांनी केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, १ ऑगस्ट २०२२


# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात होणार यंदाची मॅरेथॉन स्पर्धा; तारीख निश्चित नाही

**ठाणे :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने दोन वर्षे मागे पडलेली मॅरेथॉन स्पर्धा यंदा होईल की नाही हाच प्रश्न होता. मात्र ही स्पर्धा घेण्याची तयारी आता महापालिका प्रशासनाने केली आहे. ती स्पर्धा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून आयोजिण्यात येणार आहे. पण ती कधी होणार ही तारीख अद्यापही स्पष्ट जाहीर केलेली नाही अशी माहिती पालिका सूत्रांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र व राज्य शासनाच्यावतीने मार्गदर्शक सुचनेनुसार ठाणे महानगरपालिका व विविध सामाजिक संस्थेच्या विद्यमाने येत्या १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा,वक्तृत्व, निबंध, चित्रकला स्पर्धा, चित्र प्रदर्शन, नृत्य, बाईक रॅली अशा विविधांगी 'स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव'' साजरा करण्यात येणार असून त्यातच विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत या वयोगटात २१ किमी ते ५ किमी अंतरपर्यंतच्या स्पर्धा आयोजिण्यात येत होत्या. मात्र यंदा १० किमी अंतराची मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात जाणार आहे. अशी माहिती पालिका सूत्रांनी दिली.

# स्वाईन फ्लूची चाचणी होणार पालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांवर विनामूल्य चाचणीसाठी हवी डॉक्टरांची लेखी शिफारस

## महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी केली घोषणा

**ठाणे :** स्वाईन फ्लूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने स्वाईन फ्लूची चाचणी महापालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांवर विनामूल्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या चाचणीसाठी संबंधित डॉक्टरांची लेखी शिफारस लागेल, अशी माहिती ठाणे महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. विपिन शर्मा यांनी दिली आहे.

जुलैमधील पावसाच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात स्वाईन फ्लूचा धोका वाढत आहे. महिनाभरात स्वाईन फ्लूचे २०




रुग्ण आढळले. त्यापैकी १५ जण बरे झाले आहेत. २ जणांचे निधन झाले. आतापर्यंत रुग्ण सापडलेल्या परिसरातील हजारो घरांचे सर्वेक्षण आरोग्य विभागामार्फत करण्यात आले. त्यात नवीन रुग्ण आढळलेले नाहीत.

**लक्षणे आणि काळजी**

ताप, कोरडा खोकला, घशात खवखव, भूक मंदावणे, डोके दुखणे ही स्वाईन फ्लू ची लक्षणे असून ती जाणवल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. तसेच, कोविड काळाप्रमाणेच मास्क वापरणे, गर्दीत जाणे टाळणे ही पथ्ये पाळावीत, असेही आवाहन महापालिकेने केले आहे.

# मुख्यमंत्री शिंदेंनी गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा

***ठाणे:*** *मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावे असे युवा साहित्य अर्जुन विष्णू जाधव यांनी मुख्यमंत्री यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.*

*मुंबईतील अनेक गिरणी कामगारांच्या घरांचे प्रश्न जैसे थे असून अनेक गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. काही काही गिरणी कामगार आपल्या घराचं स्वप्न पाहत मरून गेले आहेत. काही गिरणी कामगारांची मुले साहित्यिक, कलावंत, पत्रकार इत्यादी क्षेत्रात कार्यरत असून त्यांना आपल्या हक्काच्या घराची गरज आहे. गिरणी कामगार हे पश्चिम महाराष्ट्र,मराठावाडा, कोकण अर्थात महाराष्ट्रातील जास्त आहेत. तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः जातीने लक्ष घालून भिजत पडलेला गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावा अशी मागणी युवा साहित्यिक अर्जुन विष्णू जाधव यांनी एका पत्रकाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.*

# ठाण्यात मिळणार फुटबॉल प्रशिक्षण; ५ फुटबॉल प्रशिक्षण केंद्राला राज्य शासनाकडून निधी मंजूर

**ठाणे:** ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक फुटबॉल प्रेमी असून फुटबॉल खेळाच्या प्रशिक्षणासाठी योग्य मैदान व जागा उपलब्ध नसल्याने क्रिडाप्रेमींची प्रचंड कुंचबना होत होती. त्यातच या क्रीडाप्रेमींनी याबाबत मागणी केली होती. त्यानुसारच शासनाच्या नगरविकास विभागाकडे मागणी केली असता, राज्य शासनाने ओवळा-माजिवडा मतदारसंघात ५ फुटबॉल प्रशिक्षण केंद्र मंजूर केले असून त्या केंद्रांसाठी प्रत्येकी १ कोटी याप्रमाणे ५ कोटी रूपये ठाणे महापालिकेकडे वर्ग केलेला आहेत. तसेच त्या केंद्रांवर महापालिकेच्या माध्यमातून मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

ठामपा हद्दीमध्ये लोकमान्यनगर येथील रामचंद्र ठाकुर तरण तलावाजवळ, भिमनगर येथील म्हाडा वसाहतीजवळ, पवार नगर येथील प्रबोधनकार ठाकरे मैदानामध्ये, आनंदनगर जवळील स्वामी समर्थ मैदानामध्ये, वाघबीळ येथील मैदानाच्या आरक्षित भुखंडावर करण्याचे निश्चित झालेले असून लवकरच कामाला सुरूवात होणार आहे. या फुटबॉल प्रशिक्षण केंद्रामध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून फुटबॉलचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार असून फुटबॉलच्या नियमावलीनुसार या ठिकाणी सामने ही खेळविले जाणार आहे. तसेच फुटबॉल टर्फला चारही बाजूंनी लोखंडी जाळी असणार असून पूर्णपणे रबरी सोलींगमुळे (टर्फ) खेळाडूंना कुठल्याही प्रकारे इजा होणार नाही. त्याचबरोबर मैदानाच्या चोहोबाजूंनी फ्लड लाईटची व्यवस्था असल्याने रात्री १० वाजेपर्यंत सुध्दा या ठिकाणी खेळाडूंना सराव करता येऊ शकेल. प्रत्येक फुटबॉल टर्फच्या ठिकाणी प्रशिक्षित प्रशिक्षकांची सोय असल्याने फुटबॉलच्या नियमावलीनुसार या ठिकाणी खेळाडूंना प्रशिक्षण दिले जाईल त्यामुळे ठाणे शहरातून भविष्यामध्ये पेले सारखे जागतिक दर्जाचे फुटबॉल खेळाडू निर्माण होतील, अशी अपेक्षा आमदार सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

# गोपाळकाला (दहिहंडी) निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करा

## आमदार सरनाईकांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**ठाणे:** मोठ्या प्रमाणावर तरूण-तरूणींचा सहभागी होत असलेल्या दहिहंडी हा उत्सव 'राष्ट्रीय सण म्हणून जाहिर करून त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी द्यावी अशी मागणी शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. गोपाळकाल्याच्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांना असलेल्या अधिकारानुसार फक्त मुंबई व ठाणे विभागाला सुट्टी जाहिर होते. परंतू, शासन स्तरावर अद्यापपर्यंत कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला गेलेला नाही.त्यामुळे यावर्षी येणारा गोपाळकाला उत्सव १९ ऑगस्ट, २०२२ रोजी साजरा होणार असून मुख्यमंत्री या नात्याने आपण या दिवशी शासन स्तरावर 'राष्ट्रीय सण म्हणून जाहिर करून त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घ्यावा. असेही सरनाईक यांनी म्हटले आहे.

## दोन दलाल महिलांना अटक ; पीडित चौघांची सुटका

फूस लावून महिलांना वेश्यागमनास लावणाऱ्या दोन दलाल महिलांना ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षेच्या पथकाने अटक केली. तसेच त्यांच्या तातडीतून चार पीडित महिलांचीही सुटका करण्यात आली आहे. ही करावाई ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या पथकाने बुधवारी कापुरबावडी सर्कल, येथे बोगस ग्राहक पाठवुन केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# ठाणे विभागासाठी कळवा येथे बसपोर्ट विकसित करावे – मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**ठाणे:** कळवा येथे राज्य परिवहन (एस. टी.) महामंडळाचे विभागीय कार्यशाळा व विभागीय भांडार आस्थापना कार्यरत आहे. एस. टी. महामंडळाच्या बस गाड्यांचे मोठ्या प्रमाणात दुरुस्ती केली जाते. तसेच विभागीय भांडारामार्फत ठाणे विभागातील सर्व आगारांना दैनंदिन लागणाऱ्या साहित्यांचा पुरवठा केला जातो. येथे कर्मचाऱ्यांसाठी, प्रवाशांसाठी सार्वजनिक वाहतूक सुविधा अपुऱ्या पडत आहे. त्यासाठी एस. टी. महामंडळाच्या उपलब्ध जागेवर कळवा येथे अद्ययावत बसपोर्ट विकसित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, ठाणे महानगरपालिका आयुक्त विपिन शर्मा यांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, कळवा येथे राज्य परिवहन महामंडळाची जागा आहे. येथे बस गाड्या दुरुस्तीसाठी गाळे, भांडार विभाग, वॉशिंग रॅम, वाचनमन केबिन, स्क्रॅपयार्ड, दुरुस्तीसाठी आलेल्या गाड्या उभ्या करण्यासाठी जागा, अशा आवश्यक सोयी सुविधांसह नव्याने आराखडा सादर करावा. तसेच ठाणे रेल्वे स्टेशनलगतच्या जागेवर एस.टी. डेपोसह सार्वजनिक पार्कींग, वाणिज्य वापराचे बांधकाम, चालक–वाहक विश्रांतीगृह, आरक्षण व चौकशी कक्ष, प्रवाशी उतरण्यासाठी स्वतंत्र सोय, कार्यालय आस्थापना याचा समावेश करुन सुधारित आराखडा तयार करावा. अशा सूचना देऊन ठाणे जिल्ह्यातील सार्वजनिक वाहतूक सुविधांचा मुख्यमंत्री शिंदे यांनी आढावा घेतला.

## ठाण्यातील तहसील, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या पुनर्विकासाचे काम जलद गतीने करा

### – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे:** ठाणे शहरातील सार्वजनिक बांधकाम आणि ठाणे तहसील कार्यालयाच्या पुनर्विकासाचे काम जलद गतीने करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिल्या या कार्यालयाच्या पुनर्विकासाचा एकत्रित प्रस्ताव तातडीने पाठविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

ठाणे शहरातील सार्वजनिक बांधकाम आणि ठाणे तहसील या दोन कार्यालयांचा एकत्रित पुनर्विकास करण्यात येत असून त्याचा आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावा घेतला. सहयाद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीला गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, ग्रामविकास विभागाने अपर मुख्य सचिव राजेशकुमार, प्रधान सचिव सोनिया सेठी, ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. बिपिन शर्मा यांच्यासह सबंधित अधिकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम आणि तहसील कार्यालयाचे नुतनीकरण करण्यात येत आहे. या कार्यालयांच्या पुनर्विकासाचा एकत्रित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

मुख्यमंत्री म्हणाले, पुनर्विकास करताना ठाणे महापालिकेने सर्व शासकीय कार्यालयाना आता असलेल्या जागेपेक्षा किमान दुप्पट जागा मिळेल असे नियोजन करावे. वाहन तळाची व्यापक व्यवस्था करावी, आराखड्यात तसे नियोजन करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

ठाणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय अधिकारी– कर्मचारी वसाहतीचे पुनर्विकास करण्यासाठीदेखील प्रस्ताव सादर करावा. तेथील काही जागा बस टर्मिनलसाठी ठाणे महापालिकेस देता येईल का याचाही विचार करण्याच्या, सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. या कार्यालयांचे नुतनीकरण करताना या कार्यालयात काळानुरूप सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

नूतनीकरणाचे काम करताना या कार्यालयाच्या जवळ असणाऱ्या कन्या शाळेत ही कार्यालये स्थलांतरित करण्यात यावीत, जेणेकरून नुतनीकरण करताना कोणतेही कार्यालय बंद राहणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

### जमीन मालकांना १०० टक्के मोबदला द्या

ठाणे जिल्ह्यातील सागरी महामार्गासाठी जमीन अधिग्रहणाचे काम सुरू असून जमीन मालकांना १०० टक्के मोबदला देण्यासाठी महसूल, नगरविकास आणि ठाणे महानगरपालिका यांनी एकत्रित आराखडा तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिल्या.

सस्नेह निमंत्रण
क्रियांश जनरल स्टोअर
उद्घाटन समारंभ
उद्घाटन दिनांक - ०७ ऑगस्ट २०२२ रोजी,
रविवारी ठिक सकाळी ११.३० मि.
-: स्थळ :-
शॉप नं.०६, आई जिवदानी कॉम्प्लेक्स, गुरुदर्शन नगर,
मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पुर्व), ठाणे - ४०० ६१२.
-: उद्घाटक प्रमुख :-
मा. श्री. शैलेश दादा पाटील
दिवा उपशहर प्रमुख / नगरसेवक
-: सन्माननिय उपस्थिती :-
मा. श्री. कैलेश दादा पाटील (समाजसेवक)
मा. श्री. डॉ. कुलदिप महाजन (एस् हॉस्पिटल, दिवा)
मा. श्री. सुहास खंडागळे (विशेष प्रतिनिधी, दैनिक सागर / संपादक, दिवा न्युज)
-: निमंत्रक :-
श्री. रामचंद्र कृष्णा जाधव
श्री. किरण रामचंद्र जाधव
सौ. शीला रामचंद्र जाधव
श्री. अरुणा किरण जाधव
श्री. विरधवल तात्याबा गायकवाड
सौ. गौतमी विरधवल गायकवाड
संपर्क क्र. ९९८७५१२००१